**<u>वादीतर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. एस. एस. निकम वकील.</u>**

**२०**. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे नकाशापुर्वी वादीच्या घराचे बांधकाम माझ्या घरापेक्षा जास्त होते. सिटी सर्वे नंतर आजअखेर पर्यंत मी किंवा वादींनी आमच्यातील सामाईक भिंत बदललेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे नंतर मी माझ्या घराच्या पुर्वेकडील बाजूत पक्के बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ते बांधकाम वादीच्या जमिनीत अतिक्रमण करुन केले आहे.

**२१**. दावा दाखल झाल्यापासून मी वादीच्या मिळकतीत गेलेलो नाही. दावा दाखल झाल्यानंतर माझ्या व वादीच्या मिळकतीची सिटी सर्वे मार्फत दोन वेळा मोजणी झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मोजणीमध्ये मी वादीच्या जागेत अतिक्रमण केल्याचे दिसून आलेले आहे. माझ्या घराचे पुर्वेकडील बांधकाम वादीच्या बांधकामापेक्षा थोडे उंच आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. ८५ व ८६ मधील फोटोप्रमाणे माझ्या घराचे पाणी माझ्या व वादीच्या सामाईक भिंतीवरती पडते. हे म्हणणे खरे नाही की, पावसाळयामध्ये आमच्यातील सामाईक भिंतीमुळे आमच्या दोघांच्या घरात ओलावा येतो.

**२२**. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घराचे पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या मिळकतीवर केलेल्या अतिक्रमणाचा ताबा देणे लागू नये यासाठी मी खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी २००२ साली परवानगी घेऊन बांधकाम केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र देऊन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १४.१०.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.